# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १९ नोव्हेंबर २०२४

---

जळगाव दि.१९ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भारत सरकारच्या युवा कार्य व क्रिडामंत्रालय, प्रादेशिक संचालनालय,रासेयो पुणे, आणि विद्यापीठातील रासेया विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पश्चिम विभागीय रासेयो प्रजासत्ताक दिन पथसंचलन पुर्व शिबीराचा समारोप दि.२१ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या शिबीराचा समारोप विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असून प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे व व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे व महाराष्ट्राच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातील स्टेट लायझनिंग अधिकारी डॉ.निलेश पाठक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे. हा समारंभ गुरुवार दि. २१ रोजी सकाळी ११.३० वा. विद्यापीठाच्या अधिसभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या शिबीरात ७ राज्यातील २०० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले असून हे शिबीर दि.१२ नोव्हेंबर पासून आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे, रासेयो प्रादेशिक संचालक डॉ.अजय शिंदे आणि कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील
जनसंपर्क अधिकारी